# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३११७ email:-establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./1690 /२०२३ दि. ०४/०७/२०२३

## *परिपत्रक*

**संदर्भ:-** विद्यापीठ परिपत्रक क्र. गों.वि./आस्था./१७२०/२०२३ दिनांक २७/०६/२०२३

उपरोक्त परिपत्रकाचे अनुषंगाने विद्यापीठ आस्थापनेवरील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, संदर्भांकित परिपत्रकान्वये विद्यापीठाच्या दहाव्या दीक्षांत समारंभाच्या कामकाजाकरीता दिनांक २७/०६/२०२३ पासून दिनांक ०५/०७/२०२३ पर्यंत सर्व सार्वजनिक व साप्ताहिक सुट्या रद्द करण्यात आलेल्या आहेत. उक्त कालावधीतील सार्वजनिक व साप्ताहिक सुट्या ऐवजी पर्यायी रजा मिळण्याबाबत सर्व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांची मागणी पाहता खालील प्रमाणे पर्यायी रजा मंजूर करण्यात येत आहे.

दिनांक ०६/०७/२०२३ व दिनांक ०७/०७/२०२३ रोजी विद्यापीठ आस्थापनेवरील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना (सरळसेवा सहाय्यक प्राध्यापक पदभरती (जाहिरात क्रमांक ५०/२०२३) प्रक्रियेमध्ये सहभागी शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी वगळून) पर्यायी रजा जाहिर करण्यात येत आहे.

**(डॉ. अनिल हिरेखण)**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

***प्रतिलिपी माहितीकरीता सादर:-***

1. *मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
2. *मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
3. *सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना निर्देश देण्यात येते की, आपणासह आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सदर परिपत्रकाबाबत अवगत करावे.*
4. *मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, दिनांक ०६/०७/२०२३ व दिनांक ०७/०७/२०२३ रोजी विद्यापीठ कामकाज बंद राहील याची नोंद घ्यावी.*
5. *सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.*

DVRADE E:\Letters\Circular 186